**राज्यातील सहकारी सूत गिरण्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी त्यांना अर्थसहाय्य देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय क्रमांक : सूतगि १०११/प्र.क्र.१३८/टेक्स १ (ब),
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ४ नोव्हेंबर,२०११.

**संदर्भ :** संचालनालय, वस्त्रोद्योग, नागपूर यांचे पत्र क्र. कार्या-४/सूतगि/९/२०११, दिनांक २४/६/२०११.

**प्रस्तावना :-**

वस्त्रोद्योग व्यवसायात असलेली जागतिक व देशांतर्गत मंदी, कापसाचे मोठया प्रमाणात वाढलेले भाव, सूताच्या मालास भाव व मागणी नसल्याने मागील ८ ते ९ महिन्यांपासून वस्त्रोद्योग व्यवसाय अत्यंत अडचणीत आलेला आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ व विविध सहकारी सूत गिरण्यांचे प्रतिनिधी यांनी या व्यवसायास अडचणीतून बाहेर काढण्यासाठी आर्थिक मदतीची मागणी शासनाकडे केली आहे. त्यानुषंगाने राज्यातील चालू असलेल्या सहकारी सूत गिरण्यांना आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी सहकारी सूत गिरण्यांना अर्थसहाय्य देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

दिनांक २५ ऑक्टोबर,२०११ च्या मंत्रीमंडळ बैठकीतील निर्णयानुसार राज्यातील चालू असलेल्या ५६ सहकारी सूत गिरण्यांच्या माहे एप्रिल,२०११ ते सप्टेंबर,२०११ या कालावधीत झालेल्या सूत उत्पादनावर प्रति किलो रु.२०/- या दराने बिनव्याजी कर्ज उपलब्ध करुन देण्यास शासन मंजुरी देत आहे.

२. सदरचे बिनव्याजी कर्ज एक वर्ष सवलतीच्या कालावधीनंतर समान तीन वार्षिक हप्त्याल संबंधीत सहकारी सूत गिरण्यांनी शासनास परत करावयाचे आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेब साईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०११११०४१५००३३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( श्री. बा. पवार )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग.

प्रति,
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मंबई - ३२,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
मा. राज्यमंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ मुंबई / महाराष्ट्र-२,नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र - १, मुंबई / महाराष्ट्र - २, नागपूर,
कार्यासन अधिकारी, १६ सी, १७ सी, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
वित्त विभाग, व्यय-२/ आर्थसंकल्प-१३ , मंत्रालय, मुंबई-३२,
नियोजन विभाग, कार्यासन - १४३१, मंत्रालय, मुंबई-३२,
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, संचालनालय, वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
प्रादेशिक उपसंचालक, वस्त्रोद्योग, औरंगाबाद / नागपूर / सोलापूर / मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्यादित, वकील हाऊस, मुंबई - १,
निवड नस्ती.